सोमवार, दि. २३ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २०२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# महास्वच्छता अभियानात उचलला १५० टन कचरा!

## माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या वाढदिवसानिमित्त मनपाचा लोकसहभागातून उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** माजी केंद्रीय मंत्री, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे यांच्या वाढदिवसानिमित्त उपमहापौर राजेश राऊत यांच्या पुढाकाराने महानगरपालिका आणि लोकसहभागातून रविवारी ( ता.२२) जालना शहरात महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. सकाळी ०६.०० ते दुपारी ०२.०० या वेळेत शहरातील विविध भागात साचलेला दीडशे टन कचरा संकलित करून योग्य रितीने विल्हेवाट लावण्यात आली. तसेच प्लास्टिक मुक्त शहरासाठी दहा हजार कापडी पिशव्यांचे वाटपही करण्यात आले.

सकाळी स्वा. सै. रामभाऊजी राऊत यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून भाजपाचे महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे यांच्या हस्ते अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत , समस्त महाजन ट्रस्टच्या नूतन दीदी देसाई, महिला व बालकल्याण सभापती संध्याताई देठे ,स्वच्छता सभापती कपिल भुरेवाल, पाणी पुरवठा सभापती पूनम स्वामी, उपसभापती अनामिका पांगारकर, नगरसेवक अजय (जगदीश) भरतीया, अशोक पवार, शशिकांत घुगे, अर्जुन गेही, सिद्धिविनायक मुळे, रणजित मगरे, शांतीलाल राऊत, हेमंत ठक्कर, आकाश देशमाने, बंडू चव्हाण,उदय शिंदे, राज स्वामी ,मनपाचे सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे,करविभाग प्रमुख राहुल देशमुख सहायक आयुक्त विजय फुलंब्रीकर ,स्वच्छता विभाग प्रमुख कैलास चांदणे,उद्यान प्रमुख सचिन पितळे, हेमंत ठक्कर,उदय शिंदे, लायन्स क्लबचे डॉ. गिरीश पाकणीकर, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, कल्याण भदनेकर, देविदास देशमुख, राजेश जोशी, संजय देठे, गणेश जल्लेवार, सुनील पवार,






रोशन चौधरी,संजय वाघमारे, पाणीपुरवठा वितरण प्रमुख राजू मोरे, स्वच्छता निरीक्षक शोएब पठाण विक्रम कीर, अरूण वानखेडे यांच्यासह नगरसेवक, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.

उद्घाटन प्रसंगी समस्त महाजन ट्रस्टच्या नूतन दीदी देसाई यांनी महास्वच्छता अभियानाचे कौतुक करत प्रत्येक नागरिकाने या उपक्रमाचा आदर्श घेऊन आपला वाढदिवस अशा प्रकारे साजरा करावा असे आवाहन केले.

महापौर वंदनाताई मगरे यांनी नागरिकांनी महास्वच्छता अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करत आभार मानले.

दिवसभर शहरातील स्वच्छतेच्या १२ ( झोन ) विभागांमध्ये १२ जेसीबी,२४ ट्रॅक्टर, चार हायवा, १२० सफाई कामगारांच्या मदतीने अभियान यशस्वी करण्यात आले. नागरिकांनी मोठ्या संख्येने महास्वच्छता अभियानात सहभाग घेतला.

**प्रत्येकाने परिसर स्वच्छतेवर लक्ष द्यावे - भास्करराव पाटील दानवे**

माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांना वाढदिवसानिमित्त डि.जे. लावून नाचणे, केक कापणे अशी भंपकबाजी पटत नाही. त्याऐवजी वृक्षारोपण ,रक्तदान शिबिर ,समाज उपयोगी उपक्रम राबवावेत अशा सूचना त्यांनी वेळोवेळी दिल्या आहेत. उपमहापौर राजेश राऊत यांनी लोकसहभागातून स्वच्छतेचे महाअभियान राबवत वाढदिवसाची खरी भेट दिली. असे गौरवोद्गार भारतीय जनता पक्षाचे महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे यांनी व्यक्त केले.तथापि प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या वाढदिवसानिमित्त आपला परिसर स्वच्छ करण्यावर लक्ष केंद्रित करावे असे आवाहन ही भास्करराव दानवे यांनी यावेळी केले.

### स्वच्छतेची चळवळ गतिमान करणार - राजेश राऊत


जालना शहर आणि जिल्ह्याच्या विकासाचा अनुशेष माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी भरून काढला आहे.त्यांच्या वाढदिवसानिमित्त शहर स्वच्छतेला अधिक गती देण्यासाठी ''स्वच्छ ,हरित आणि पर्यावरण पूरक शहर'' संकल्पनेने लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या महास्वच्छता अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्लास्टिक मुक्त शहरासाठी कापडी पिशव्यांचा वापर करण्याबाबत जनजागृती केली जाणार असून स्वच्छतेची चळवळ अधिक गतिमान करणार असल्याचे उपमहापौर राजेश राऊत यांनी याप्रसंगी सांगितले.

# ओबीसीचा बुलंद आवाज शांत झाला; राज्यभर शोककळा

## शब्बीर अहमद अन्सारी यांचे निधन

**जालना । प्रतिनिधी -** अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ओबीसी समाजाची चळवळ उभी करून फुले , शाहू व आंबेडकर यांचे समतेचे विचार वंचित समाजा पर्यंत पोहोचण्याचे कार्य करून मुस्लिम ओबीसींना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये यशो शिखरावर नेणाऱ्या आणिआपलं संपूर्ण आयुष्य ओबीसी समाजाच्या प्रश्नासाठी समर्पित करणारा अभ्यासू दमदार आवाज शब्बीर अहमद अन्सारी ( अध्यक्ष ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशन ) यांचा रविवारी शांत झाला.

शब्बीर अन्सारी हे बऱ्याच दिवसापासून आजारी होते त्यांच्या आजारावर उपचार चालू होता रविवारी सकाळी



साडे बारा वाजता त्यांची प्राणज्योत त्यांच्या राहत्या घरी मावळली.

महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय पटलावर, इतर मागासवर्गीय () चळवळीचा आवाज गेल्या अनेक दशकांपासून जोरदारपणे घुमत आला आहे; आणि या सातत्यपूर्ण लढ्याच्या अग्रभागी शब्बीर अहमद अन्सारी हे खंबीरपणे उभे आहेत. तब्बल ४५ वर्षांच्या प्रदीर्घ काळासाठी, अन्सारी यांनी आपली वैयक्तिक ध्येये आणि आकांक्षा बाजूला सारून, आपले संपूर्ण आयुष्य समाजाचे हक्क आणि कल्याण यासाठी समर्पित केले आहे. त्यांची अविचल निष्ठा आणि अथक प्रयत्न कोणाच्याही नजरेतून सुटले नाहीत; उलट, त्यांच्या या प्रयत्नांमुळेच राज्य सरकारला समाजाच्या दखल घेऊन तब्बल ५२ समस्या आणि मागण्यांची सरकारी

पान २ वर

ऑल इंडिया ओबीसी ऑर्गनायझेशनचे ज्येष्ठ नेते व प्रख्यात समाजसेवक श्री. शब्बीर अहमद अंसारी यांच्या दुःखद निधनाची बातमी अत्यंत वेदनादायी व धक्कादायक आहे. श्री. अंसारी यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी समर्पित केले. वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी निस्वार्थ भावनेने सातत्याने कार्य करत समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या कार्यातून सामाजिक बांधिलकी, समर्पण आणि संवेदनशीलता यांचे उत्तम उदाहरण दिसून येते. त्यांच्या निधनामुळे समाजाने एक कर्तृत्ववान, दूरदृष्टी असलेले आणि समर्पित नेतृत्व गमावले आहे. त्यांचे कार्य, विचार व समाजाप्रती असलेली निष्ठा भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो, हीच प्रार्थना. भावपूर्ण श्रद्धांजली!

**- खासदार डॉ. कल्याण काळे**

# रामनवमी निमित्त राम मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम



**जालना | प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या वतीने रामनवमीनिमित्त राम मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे जालना शहर स्वच्छ आणि सुंदर परिवर्तन बनावे या अभियानन आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता मोहीमला जालना महानगरपालिकेचे महापौर वंदना मगरे उपमापोर राजेश राऊत पाणीपुरवठा सभापती पुनम राज स्वामी स्वच्छता व आरोग्य सभापती कपिल भुरेवाल स्वच्छता व आरोग्य उपसभापती अनामिका विजय पांगारकर नगरसेवक अशोक पवार नगरसेवक विजय जाधव महानगरपालिकेचे सहायक आयुक्त केशव कानपुडे आदींची उपस्थिती होती स्वच्छता पाया रोगायी टाळ्या प्लास्टिक टाळा आणि पर्यावरण वाचवा या थीमंतर्गत ही मोहीम राबविण्यात आली आहे राम मंदिरा पासून ही स्वच्छता मोहीम सुरुवात करण्यात आली आहे शहर स्वच्छता आणि सुंदर बनवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा व स्वच्छतेत हातभार लावावा असे आवाहन करण्यात आले आहे

# हर्षवर्धन सदगीर बनला सातवा डबल महाराष्ट्र केसरी

**पुणे -** पुण्यातील वाघोली, तालुका हवेली इथं सुरु असलेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धा सुरु आहे. महाराष्ट्र केसरीचा अंतिम सामना महेंद्र गायकवाड ( ) आणि हर्षवर्धन सदगीर ( ) यांच्यात झाला. हर्षवर्धन सदगीर यानं महेंद्र गायकवाड याला ४-२ असं पराभूत केलं. या विजयासह हर्षवर्धन सदगीर सातवा डबल महाराष्ट्र केसरी झाला.

हर्षवर्धन सदगीर सातवा डबल महाराष्ट्र केसरी

महेंद्र गायकवाड यानं पहिल्या हाफमध्ये १ गुण मिळवत आघाडी घेतली. यानंतर हर्षवर्धन सदगीर यानं एक गुण मिळवत बरोबरी केली. पहिला हाफ संपेपर्यंत १-१ असा सामना बरोबरीत होता. दुसऱ्या हाफमध्ये महेंद्र गायकवाड याला एक्टिव्हिटी टास्क देण्यात आला, यात त्याला गुण मिळवता आला नाही. यामुळं हर्षवर्धन सदगीरला एक गुण मिळाला. यानंतर हर्षवर्धन सदगीर यानं दोन गुण मिळवले. अशा प्रकारे हर्षवर्धन सदगीर यानं ४-१ अशी आघाडी मिळवली.यानंतर हर्षवर्धन सदगीर बाहेर गेल्यानं एक गुण महेंद्र गायकवाडला मिळाला. कुस्तीचा वेळ संपला तेव्हा हर्षवर्धन सदगीर यानं ४-२ असा विजय मिळवला.

महेंद्र गायकवाड यानं माती विभागातील अंतिम फेरीत सिकंदर शेखचा पराभव केला. तर हर्षवर्धन सदगीर यानं जय पाटील याचा गादी विभागातील अंतिम फेरीत केला. यामुळं महाराष्ट्र केसरीच्या अंतिम लढतीत हर्षवर्धन सदगीर आणि महेंद्र गायकवाड आमने सामने आले.

माती विभागात महेंद्र गायकवाड विजयी

माती विभागाच्या अंतिम फेरीत सोलापूर जिल्ह्यातून महेंद्र गायकवाड आणि हिंगोली जिल्ह्यातून सिकंदर शेख आमने सामने आले होते. या कुस्तीत महेंद्र गायकवाड यानं ३-० असा विजय मिळवला. पहिल्या हाफमधील पहिल्या मिनिटातच महेंद्र गायकवाड यानं २ गुण मिळवले. यानंतर पुन्हा एकदा महेंद्र गायकवाड यानं १ गुण मिळवला. पहिल्या हाफमध्ये महेंद्र गायकवाड ३-० अशा आघाडीवर होता. दुसऱ्या हाफमध्ये महेंद्र गायकवाड याच्या विरोधात सिकंदर शेख यानं गुण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, सिकंदर शेख याला गुण मिळवण्यात अपयश आलं. यामुळं

पान २ वर

# वयाची बंधने झुगारून धावले ८५० अबालवृद्ध!

## जालना रनर्स मॅरेथॉनमधून फिट जालनाचा संदेश

**जालना । प्रतिनिधी -** फॅब रनर ग्रुप जालना आणि नगर सायकलींग क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आज रविवार दि. २२ मार्च रोजी आयोजित जालना रनर्स मॅरेथॉनमध्ये अबालवृद्धांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत फिट जालनाचा संदेश दिला. या स्पर्धेत एकूण ८५० धावपटूंनी सहभाग नोंदवून ही मॅरेथॉन यशस्वी केली.

सकाळी ६.३० वाजता मंठा रोडवरील कल्याणी ग्रीन्स येथे जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, गटनेते भास्कर आबा दानवे, संध्या देठे, फॅब रनर ग्रुपचे अर्जुन जगताप, प्रशांत भाले, नगर सायकलींग क्लबचे अध्यक्ष गौरव फिरोदिया यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धे ला सुरुवात केली. ही स्पर्धा १० किमी, ५ किमी आणि ३ किमी अशा तीन गटांत पार पडली.

महिलांच्या १० किलोमीटर गटात (१८ ते ३५ वयोगट) सपना विनोद सुरडकर (प्रथम), साक्षी कृष्णा खोतकर (द्वितीय), अनामिका दिलीप दिवटे (तृतीय) ३६ ते ५० वयोगटात विश्रांती गायकवाड, अश्विनी जाधव, अनिता कापरे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय, ५१ वर्ष व त्यापुढील वयोगटात कीर्ती काबरा, डॉ. स्मिता कुलकर्णी,



डॉ. स्वाती रवींद्र देशमुख यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला.

पुरुषांच्या १० किलोमीटर गटात (१८ ते ३५ वयोगट) शिरीष यादव, चेतन पोकळे, अभिजीत मालपाणी यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय, ३६ ते ५० वयोगटात राकेश यादव, प्रशांत राऊत, संतोष गंडाळ यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय, ५१ वर्ष व त्यापुढील वयोगटात महेश महाजन, सतीश यादव, सुधीर कुलकर्णी यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. महिलांच्या ५ किलोमीटर गटात (१८ ते ३५ वयोगट) पूजा जांगिड, सीमा धांडे, मनीषा भुंबर, ३६ ते ५० वयोगटात तृप्ती मोगल, जयश्री अग्रवाल, मीना सुरवसे, ५१ वर्षापुढील वयोगटात सविता पाठक, अरविंद नाईक, राजश्री टाचले, पुरुषांच्या ५ किलोमीटर गटात (१८ ते ३५ वयोगट)

पान २ वर

संपादकीय पान

# जरा याद करो कुर्बानी ...

दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९५ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फ ेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला ... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शहिद दिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

# बदलते हवामान संपूर्ण सृष्टीसाठी चिंताजनक

जगातील भयावह घटना पहाता बदलत्या हवामानावर नियंत्रण ठेवणे काळाची गरज.जगात महाप्रलय,भूकंप, सुनामी,वणवे लागणे,ज्वालामुखीचा उद्रेक,अवकाळी पाऊस,अती उष्णता, अती थंडी,ग्लेशियर वितळणे, समुद्राची पातळी वाढने किंवा येणाऱ्या नैसर्गिक आपदा याची सुचना यावर नियंत्रण कसे ठेवता येईल व येणाऱ्या नैसर्गिक आपदांची माहिती कशी मिळु शकेल याउद्देश २३ मार्च १९५० ला जागतिक हवामान संस्थेची स्थापना करण्यात आली.यापुर्वी १९२२ ला हवामान शास्त्रज्ञ लुइस फ्राय रिचर्डसन यांनी हवामानाच्या अंदाजाचा शोध लावुन हवामान पहाण्याकरीता सांख्यिकी पध्दत शोधून त्यानुसार काही प्रमाणात हवामान अंदाज वर्तविता येऊ लागले व हवामानाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे काम केले. हवामान शास्त्रज्ञ लुइस फ्राय रिचर्डसन यांनी लावलेला शोध आज जगाला अत्यंत कारगर आणि गुणकारी सिध्द झाल्याचे आपण पहातो. त्याच अनुषंगाने १९५० ला जागतिक हवामान संस्थेची (डब्लुएमओ) स्थापना करण्यात आली या संस्थेचे मुख्यालय स्वित्झर्लंड येथील जिनेव्हा येथे आहे.यानंतर (डब्लुएमओ) संयुक्त राष्ट्राची (युएन)विषेश संस्था बनली. पहिला जागतिक हवामान दिवस २३ मार्च १९६१ रोजी साजरा करण्यात आला. त्यावेळी ३१ सदस्य देश होते आता या आंतरराष्ट्रीय संघटनेचे १९३ देशांपेक्षा जास्त सदस्य आहेत. पर्यावरणातील वाढते बदल याबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या अनुषंगाने या दिवसाला अत्यंत महत्व आहे.गेल्या २० वर्षात युद्धजन्य परिस्थिती, वाढते औद्योगिकीकरण, परमाणु परिक्षण, शहरीकरण मोठ्या प्रमाणात जंगलतोड इत्यादी अनेक कारणांमुळे हवामानातील बदलाने जगातील पर्यावरणाची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.कारण आज जगातिल पर्यावरण अत्यंत धोकादायक व भयावह स्थितीत येवून ठेपले आहे.यामुळे मानव,पशु-पक्षी व संपूर्ण जीवसृष्टीला मोठा धोका निर्माण झाला आहे.आज जगामध्ये वाढते औद्योगिकीकरण, वायुप्रदूषण, जंगलतोड, युद्धजन्य परिस्थिती,वाढती उष्णता, वाढती लोकसंख्या यामुळे हवामानात रोज वेगवेगळे आमुलाग्र बदल होतांना आपण पहातो.जगात महाप्रलय, सुनामी,भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,अती पाऊस,अती थंडी,अती उष्णता, वणवे लागणे, नैसर्गिक आपत्ती अशा अनेक घटना जगात मानवाच्या अतिरेकामुळे दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे.या येणाऱ्या आपदांची सटीक माहिती हवामान विभाग जगभर देत असते.यामुळे जगातील देश सतर्कता बाळगुन सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पाऊले उचलतात. त्यामुळे आपण समजू शकतो की हवामान खात्याची भुमिका जगासाठी अत्यंत मोलाची आणि महत्त्वाची आहे.आज अत्याधुनिक युगात उपग्रहांच्या (सेटेलाईटच्या) माध्यमातून हवामानातील बदलांचे संकेत हवामान संस्था जगभरातील संपूर्ण देशांना वेळोवेळी देत असते.

हवामानातील बदलांचे संकेत लोकांमध्ये जागृता निर्माण करण्याचे काम करीत असते.हवामान दिनाचे औचित्य साधून व हवामानातील वाढते बदल व धोका पहाता निसर्गाला संतुलित ठेवणे गरजेचे आहे.याकरीता जगातील संपूर्ण देशांनी हवामानातील मोठ्या प्रमाणात वाढते बदल पहाता आजच्या दिवसाला जास्तीत जास्त वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे.यामुळे वाढत्या हवामानातील बदलांवर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत होईल. सोबत निसर्ग प्रफुल्लित राहुन संपूर्ण जंगलातील पशु-पक्ष्यांसाठी एक आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. कारण हवामानाचे संपूर्ण गणित निसर्गावरच अवलंबून आहे. त्यामुळे निसर्ग सुरक्षित रहाला तर हवामान सुध्दा सुरक्षित राहू शकते.याचा फायदा संपूर्ण जगाला व जीवसृष्टीला होईल. जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर**

# बदलत्या परिस्थितीनुरूप ज्ञानाच्या कक्षा अधिक रुंदावण्याची गरज - प्राचार्य डॉ. भारत खंदारे

## श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयात पदवी प्रदान समारंभात व्यक्त केले मत



**जालना । प्रतिनिधी** - आजच्या झपाट्याने बदलणाऱ्या जगात मुलींनी पारंपरिक आणि जुनाट विचारसरणीचा त्याग करून ज्ञानाच्या नवीन क्षितिजांचा शोध घेतला पाहिजे. केवळ पदवी मिळवणे हे अंतिम उद्दिष्ट नसून, त्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या प्रगतीसाठी आणि स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी करणे अधिक महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ भारत खंदारे यांनी केले. येथील श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयात शुक्रवारी आयोजित पदवीप्रदान समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष महेंद्रकुमार गुप्ता होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. भारत खंदारे आणि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. महेंद्र सिरसाठ उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे सहसचिव नरेश अग्रवाल, कोषाध्यक्ष संजय अग्रवाल, संचालक राहुल अग्रवाल, प्रशासकीय अधिकारी डॉ. विद्या पटवारी, प्रभारी प्राचार्य डॉ. जितेंद्र अहिरराव, उपप्राचार्य प्रा. पूजा अरोरा तसेच वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. विजय नागोरी यांची उपस्थिती होती.

त्यांनी कौशल्यआधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना डॉ. खंदारे म्हणाले, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ सैद्धांतिक ज्ञान पुरेसे नाही, तर व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. यश सहजासहजी मिळत नाही; त्यासाठी सातत्य, कठोर परिश्रम, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असतो. अपयशाला घाबरून न जाता त्यातून शिकण्याची वृत्ती अंगीकारल्यास यश निश्चित मिळते.

डॉ. महेंद्र सिरसाठ यांनी आपल्या भाषणात मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, समाजातील अनेक अडथळ्यांवर मात करून पुढे जाण्याची ताकद मुलींमध्ये नैसर्गिकरीत्या असते. योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळाल्यास त्या कोणत्याही क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करू शकतात. भारताला खऱ्या अर्थाने सक्षम आणि प्रगत राष्ट्र बनवायचे असेल, तर महिलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे. त्यांनी विद्यार्थिनींना आयुष्यभर शिकत राहण्याचा संदेश देत सांगितले की, ''विद्यार्थी'' ही ओळख कधीच संपत नाही; प्रत्येक टप्प्यावर नवीन गोष्टी शिकण्याची तयारी ठेवली पाहिजे.

यावेळी त्यांनी यशाची पंचसूत्रीही विद्यार्थिनींसमोर मांडली. स्पष्ट ध्येय निश्चित करणे, वेळेचे योग्य नियोजन करणे, सातत्यपूर्ण प्रयत्न करणे,

आत्मविश्वास टिकवून ठेवणे आणि सकारात्मक विचारसरणी अंगीकारणे या पाच तत्त्वांवर भर देत त्यांनी विद्यार्थिनींना भविष्यातील वाटचालीसाठी प्रेरित केले.

समारंभात बी.ए., बी.कॉम. आणि एम.कॉम. अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. जितेंद्र अहिरराव यांनी केले.

पाहुण्यांचा परिचय डॉ. विद्या पटवारी व डॉ. वासुदेव उगले यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. राहुल अंभोरे यांनी केले, तर आभार प्रकटीकरण प्रा.पूजा अरोरा यांनी केले.

समारंभ यशस्वीरित्या पारपाडण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरुन

## ओबीसींचा बुलंद ...

निर्णय जारी करणे भाग पडले.

समाजातील अनेकांना भेडसावणाऱ्या सामाजिक-आर्थिक वास्तवाच्याच वातावरणात जन्मलेले आणि वाढलेले अन्सारी यांचा सामाजिक चळवळीतील प्रवेश हा काही अचानक घेतलेला निर्णय नव्हता; तर ती व्यवस्थेतील विषमता आणि प्रतिनिधित्वाचा अभाव यांबाबत झालेली एक टप्प्याटप्प्याने होणारी जाणीव होती. समाजाच्या या महत्त्वपूर्ण घटकाच्या आकांक्षा आणि गाऱ्हाणी प्रभावीपणे मांडण्यासाठी एका एकजूट आणि शक्तिशाली आवाजाची नितांत गरज आहे, हे त्यांनी अगदी सुरुवातीच्या काळातच ओळखले होते.

अन्सारी यांच्या कार्यपद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे तळागाळातील लोकांचे संघटन, बौद्धिक विचारमंथन आणि प्रशासनाशी केलेला सातत्यपूर्ण संवाद यांचा सुरेख मेळ. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र अक्षरशः पिंजून काढला; लोकांच्या आणि विविध समुदायांच्या थेट संपर्कात राहून, त्यांच्या समस्या प्रत्यक्ष समजून घेऊन आणि त्यांना एका सामूहिक शक्तीमध्ये रूपांतरित करून त्यांनी हे कार्य केले. गुंतागुंतीचे आणि क्लिष्ट प्रश्न अत्यंत सोप्या व लोकांना भावतील अशा भाषेत मांडण्याच्या त्यांच्या कौशल्यामुळे, समाजातील विविध स्तरांतील लोकांचा विश्वास आणि आदर त्यांना प्राप्त झाला आहे.

अन्सारी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मंजूर झालेल्या सरकारी निर्णयांची प्रचंड मोठी संख्याच त्यांच्या कार्याची परिणामकारकता सिद्ध करण्यासाठी पुरेशी आहे. शिक्षण आणि रोजगाराच्या संधींपासून ते सामाजिक न्याय आणि राजकीय प्रतिनिधित्वापर्यंतच्या विविध विषयांना स्पर्श करणाऱ्या या निर्णयांचा, समाजातील असंख्य व्यक्तींच्या आयुष्यावर प्रत्यक्ष आणि सकारात्मक परिणाम झाला आहे. धोरणांची त्यांना असलेली सखोल जाण आणि प्रशासकीय यंत्रणेच्या गुंतागुंतीच्या चक्रव्यूहातून मार्ग काढण्याचे त्यांचे कौशल्य, हेच या चळवळीच्या मागण्यांचे रूपांतर ठोस शासकीय कृतीमध्ये करण्यात अत्यंत निर्णायक ठरले आहे. तथापि, अन्सारी यांचा हा प्रवास आव्हानांशिवाय नव्हता. चळवळीला प्रशासनाची उदासीनता, विरोध आणि राजकीय डावपेच अशा अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागला आहे. तरीही, या सर्व प्रतिकूल परिस्थितीतही अन्सारी हे आपल्या भूमिकेवर ठाम राहिले; आपल्या कार्याचा उद्देश पूर्णपणे न्याय्य आहे यावरील त्यांच्या अढळ श्रद्धेतूनच त्यांना ही ऊर्जा मिळत राहिली. त्यांनी अनेक राजकीय वादळे झेलली; आणि प्रत्येक वेळी, हा लढा पुढे चालू ठेवण्याच्या नव्या निर्धारासह ते पुन्हा नव्या जोमाने उभे राहिले. छत्रपती संभाजी नगर येथील मंडल दिनाच्या ओबीसी मेळाव्यात त्यांनी अलीकडेच दिलेले आवेशपूर्ण भाषण त्यांच्या चिरस्थायी तळमळीचा पुरावा आहे. त्यांनी तरुण पिढीला केलेले थेट आवाहन, ज्यात त्यांनी जवळपास अर्धशतकापासून दाखवलेल्या त्याच उत्साहाने चळवळीसाठी स्वतःला वाहून घेण्याचे आवाहन केले आहे, ते ओबीसी चळवळीच्या भविष्यातील नेतृत्व आणि शाश्वततेबद्दलची त्यांची चिंता अधोरेखित करते. आजच्या व्यक्तिवादी जगात घर आणि संसार सोडून जाण्याचे त्यांचे आवाहन काहींना अतिरेकी वाटू शकते, परंतु अर्थपूर्ण सामाजिक बदल घडवण्यासाठी आवश्यक असलेली वचनबद्धता आणि त्यागाची पातळी यातून दिसून येते.

अन्सारी यांचा वारसा धोरणात्मक बदलांच्या पलीकडे विस्तारलेला आहे. ते असंख्य तरुण कार्यकर्त्यांचे मार्गदर्शक राहिले आहेत, त्यांना नेतृत्वाची धुरा सांभाळून सामाजिक न्यायासाठीचा संघर्ष पुढे चालू ठेवण्यास प्रेरित केले आहे. त्यांनी ओबीसी समाजात एकतेची आणि सामूहिक ओळखीची भावना जोपासली आहे, ज्यामुळे ते समाजात आपले हक्काचे स्थान मागण्यासाठी सक्षम झाले आहेत.

ज्या राजकीय वातावरणात उपेक्षित समाजांच्या समस्या अनेकदा बाजूला सारल्या जातात, तिथे शब्बीर अहमद अन्सारी एक शक्तिशाली आणि अविचल आवाज म्हणून कायम आहेत. त्यांची ४५ वर्षांची निःस्वार्थ सेवा ही समर्पण आणि चिकाटीचे एक प्रेरणादायी उदाहरण आहे. ओबीसी समाजासाठी संपूर्ण सामाजिक आणि आर्थिक न्यायाचा लढा सुरू असताना, शब्बीर अन्सारींसारख्या व्यक्तींचे योगदान आशेचा किरण आणि सातत्यपूर्ण सक्रियतेच्या परिवर्तनीय शक्तीचा पुरावा आहे. त्यांचे जीवनकार्य ही एक आठवण आहे की, अर्थपूर्ण बदलासाठी केवळ पाठपुरावा नव्हे, तर ध्येयाप्रती एक खोल आणि अढळ वचनबद्धता आवश्यक असते, ज्यासाठी कधीकधी त्यांनी मोठ्या तळमळीने पुरस्कार केलेल्या वैयक्तिक त्यागाचीही गरज भासते.

ऑल इंडिया ओबीसी ऑर्गनायझेशनचे नेते शब्बीर अहमद अन्सारी यांचेनिधन

ऑल इंडिया ओबीसी ऑर्गनायझेशनचे नेते तथा रेल्वे गेट, नूतन वसाहत, जुना जालना येथील रहिवासी शब्बीर अहमद अन्सारी यांचे आज, रविवार दि. २२ मार्च २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले , सहा मुली , सुना , नातवंडे असा मोठा परिवार आहे.

आज रात्री ईशा नमाजानंतर रात्री ९ वाजता त्यांची अंत्ययात्रा त्यांच्या राहत्या घरातून (रेल्वे गेट, नूतन वसाहत, जुना जालना) निघणार असून, सय्यद अहमद शेर सवार दर्गा परिसर, जुना जालना येथे नमाज-ए-जनाजा अदा करण्यात येईल. त्यानंतर लगतच्या कब्रस्तानमध्ये दफनविधी करण्यात येणार आहे.

स्वर्गीय शब्बीर अहमद अन्सारी हे देशभरात ओबीसी संघटनेच्या माध्यमातून ओबीसी आरक्षणाच्या लढ्यासाठी ओळखले जात होते. त्यांच्या निधनामुळे सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

अल्लाह तआला ने त्यांना जन्नतमध्ये उच्च स्थान प्रदान करावे आणि त्यांच्या परिवाराला या दुःखातून सावरण्याची ताकद द्यावी, अशी प्रार्थना करण्यात येत आहे.

ज्येष्ठ ओबीसी नेते शब्बीर भाई अन्सारी यांच्या दुःखद निधनाची बातमी मनाला चटका लावणारी आहे. त्यांच्या जाण्याने केवळ एक नेता नाही, तर ओबीसी समाजाचा एक बुलंद आवाज, हक्कांसाठी लढणारा खंबीर योद्धा हरपला आहे. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न येणारी आहे. आज संपूर्ण ओबीसी समाज त्यांच्या आठवणींनी भावूक झाला आहे. अल्लाह ताला मरहुमीन की मगफिरत करे और जन्नतूल फिरदोस अता करे अहले खानदान को सब्र - ए - जमील अता करे अशी प्रतिक्रीया जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शेख महेमुद यांनी दिली.

## हर्षवर्धन सदगीर ...

महेंद्र गायकवाड यानं मॅटवर होणाऱ्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

मॅट विभागातील अंतिम फेरीत हर्षवर्धन सदगीर विजयी

मॅट विभागातील अंतिम फेरीची लढत सोलापूर शहरकडून खेळणाऱ्या जय पाटील आणि नाशिककडून खेळणाऱ्या हर्षवर्धन सदगीर यांच्यात झाली. हर्षवर्धन सदगीर यानं जय पाटील याचा १०-० असा पराभव केला.

## वयाची बंधने ...

अजय धानुरे, वैभव हलनोर, विवेक म्हस्के, ३६ ते ५० वयोगटात अर्जुन जाधव, नितीन तोष्णीवाल, डॉ. ज्ञानेश्वर जाधव, ५१ पुढील वयोगटात गणेश दराडे, जयंत केंद्रे, तारकेश्वर तिवारी यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. यावेळी सर्व विजेत्यांचा घटवस्तू व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तसेच धावण्याच्या क्षेत्रात विशेष कामगिरी केल्याबद्दल जितेंद्र अग्रवाल, मिलिंद खेरुडकर, प्रशांत राऊत, महेश महाजन, सुप्रिया मापारी, कीर्ती काबरा, सुषमा केंद्रे, पंडित सुरुशे, संतोष जाधव आणि कैलास झोळगे यांचा विशेष गौरव करण्यात आला. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी फॅब रनर ग्रुपचे अर्जुन जगताप, प्रशांत भाले, कैलास मस्के, कैलास जाधव, डॉ. दिलीप दिवटे, काशिनाथ मोरे, अशोक राठी, भास्कर पवार, विष्णू पाटेकर, नागेश मापारी, डॉ. सतीश शेकडे, धनसिंग सूर्यवंशी, धर्मे श उजवणे, दिनेश अंधेवार, बलराज शिराळे, शिवाजी हिवराळे, मिलिंद वासनिक, किसन जाधव, मनोज कुमकर, दशरथ पडूळ, केसरसिंग राजपूत, संजय अंपळकर, संजय शेजुळ, राजकुंवर श्रीराम, संदीप ढगे, ईश्वर बिल्लोरे, राम हालनोर, संजय काबरा तसेच नगर सायकलिंग क्लबचे गौरव फिरोदिया, नितीन घोरपडे, कैवल्य कुलकर्णी आणि अहिल्यानगरचे आयर्नमॅन रवी पात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले. या स्पर्धेसाठी पोलीस प्रशासनाचे विशेष सहकार्य लाभले.

# उच्चशिक्षित पत्नीलाही पोटगीचा हक्क, केवळ शैक्षणिक पात्रता नवऱ्याला जबाबदारीतून मुक्त करत नाही: राजस्थान उच्च न्यायालय

**जालना -** पत्नी उच्चशिक्षित आहे आणि तिच्यात कमावण्याची क्षमता आहे, केवळ या कारणास्तव पती तिला पोटगी देण्याची आपली कायदेशीर जबाबदारी टाळू शकत नाही. पत्नी जर प्रत्यक्षात नोकरी करत नसेल आणि उदरनिर्वाहासाठी पतीवर अवलंबून असेल, तर तिला सन्मानाने जगण्यासाठी पोटगी मिळवण्याचा पूर्ण अधिकार आहे, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा राजस्थान उच्च न्यायालयाच्या जोधपूर खंडपीठाने रितू खत्री विरुद्ध नवनीत खन्ना , एस.बी. क्रिमिनल रिव्हिजन पिटीशन क्र. १०८३/२०२४ या प्रकरणात दिला आहे. या निकालामुळे देशभरातील पीडित महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या प्रकरणातील याचिकाकर्त्या रितू खत्री यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १२५ अन्वये (आता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १४४) पोटगीसाठी अर्ज केला होता. त्यांचे पती, नवनीत खन्ना, हे एका सरकारी संस्थेत सहयोगी प्राध्यापक असून त्यांचे मासिक उत्पन्न १.८० लाख रुपयांपेक्षा जास्त होते. असे असतानाही, कुटुंब न्यायालयाने याचिकाकर्त्या पत्नीला केवळ ८,००० रुपये महिना पोटगी मंजूर केली. पत्नी बी.एड., एम.एड. आणि नेट पात्र असल्याने ती स्वतः कमावू शकते, असे न्यायालयाने गृहीत धरले होते. या अपुऱ्या पोटगीच्या विरोधात पत्नीने उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याचा युक्तिवाद ग्राह्य धरला. न्यायालयाने स्पष्ट केले की, केवळ पत्नीकडे उच्च शैक्षणिक पदव्या असणे किंवा तिच्यात कमावण्याची क्षमता असणे, हे तिला पोटगी नाकारण्याचे कारण असू शकत नाही. जोपर्यंत ती प्रत्यक्षात कमावत नाही आणि तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही स्वतंत्र साधन नाही, तोपर्यंत पतीला तिची देखभाल करावीच लागेल. पतीच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीनुसार पत्नीला सन्मानजनक जीवन जगता यावे, यासाठी पुरेशी पोटगी देणे हे पतीचे वैधानिक कर्तव्य आहे, असे न्यायालयाने अधोरेखित केले. सासरच्या छळामुळे आणि घटस्फोटाच्या प्रलंबित प्रकरणामुळे पत्नी मानसिक आणि भावनिकदृष्ट्या खचलेली असताना तिला नोकरी करण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही. या निकालावर प्रतिक्रिया देताना, नोटरी असोसिएशन जालनाचे कार्याध्यक्ष, ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ''राजस्थान उच्च न्यायालयाचा हा निकाल अत्यंत स्वागतार्ह आणि महिलांच्या हक्कांसाठी एक मैलाचा दगड आहे. अनेकदा कौटुंबिक वादांमध्ये, पत्नी सुशिक्षित असल्याचे कारण पुढे करून पती पोटगीची जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करतात. हा निकाल अशा प्रवृत्तींना चाप लावणारा आहे. कायद्याने पत्नीला दिलेले संरक्षणाचे कवच केवळ तिच्या शैक्षणिक पात्रतेमुळे काढून घेतले जाऊ शकत नाही, हे या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.''

ॲड. महेश एस. धन्नावत यांनी पुढे सांगितले की, ''जालना जिल्ह्यातील परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही. येथेही अनेक सुशिक्षित महिलांना लग्नानंतर विविध कारणांमुळे, विशेषतः भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ४९८-अ (आता भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ८५) अंतर्गत येणाऱ्या छळामुळे, आपले करिअर सोडून द्यावे लागते किंवा त्या बेरोजगार राहतात. अशा प्रकरणांमध्ये हा निकाल एक महत्त्वपूर्ण आधार बनेल. या निकालामुळे पीडित महिलांना न्याय मिळण्यास मदत होईल आणि स्थानिक न्यायालयांसाठी तो एक मार्गदर्शक ठरेल.''

# नवोदय परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** नवोदय परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थाचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना सेवली सर्कल अध्यक्ष रोहित व्यवहारे यांनी केला सत्कार केला आहे.रामेश्वर बद्रीनाथ आंब्रे यांनी ९६.२५% गुण घेऊन नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे.या विद्यार्थ्यांनी पाथ्रुड चे नाव रोशन केले आहे. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून,यात पाथ्रुड येथील रामेश्वर आंब्रे याने घवघवीत यश संपादन केले आहे.त्याचा सत्कार महाराष्ट्र नवनिर्माण सेना सेवली सर्कल अध्यक्ष रोहित बद्रीनाथ व्यवहारे यांनी केला आहे.त्यावेळी पालक बद्रि आंब्रे,फ ुलाजी आंब्रे,कैलास रंगे,पंडित राठोड,मोहन राठोड,सुनील राठोड,गजानन आंब्रे,अमर आंब्रे,मधुकर राठोड,आदींची उपस्थिती होती. त्याची निवड जालना जिल्हा येथील नवोदय विद्यालयासाठी झाली आहे.रामेश्वर हा ज्ञानसाधना गुरुकुल आष्टी येथील विद्यार्थी असून त्याने अत्यंत कष्टाने आणि जिद्दीने या परीक्षेची तयारी केली होती.ग्रामीण भागातून असूनही त्याने मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे. त्याच्या या यशाबद्दल शिक्षक आणि पालकांनी आनंद व्यक्त केला आहे.त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# जाफराबाद पथक मध्ये फलटण नाईक पदी मंजीराम ऊखर्डे यांची नियुक्ती

**विष्णु मगर**
**टेंभुर्णी -** जाफराबाद तालुक्यातील होमगार्ड पथक मध्ये फलटण नाईक पदी टेंभुर्णीचे होमगार्ड मंजीराम ऊखर्डे, शिवाजी सुद्रिक, भगवान कुमकर यांना नुकतीच होमगार्ड पथकाने बढती मिळाली आहे.

या प्रमोशन चे स्टार व लेबल लावून टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती ,पोलीस जमादार चौधरी , यांच्या हस्ते स्टार लावून त्यांचे सन्मान करण्यात आले आहे.

या वेळी तुम्ही पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी सचिन तिडके , निवृत्ती सोनवणे, गंगाधर खरात, ठाकरे, सागर शिवरकर व टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



त्यांच्या या उच्च पदावर प्रमोशन झाल्याने टेंभुर्णी गावकऱ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे

त्याचबरोबर तुम्ही पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार विष्णू मगर ,रावसाहेब अंभोरे,बि. डी .सवडी, संजय राऊत, अशोक पाबळे, सुनील भाले, विनोद कळंबे, सुनील जोशी, फकरु कुरेशी, शाबेर शेख आदिने अभिनंदन केले आहे.

# पांडुरंग आठवले यांच्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन

**यवतमाळ -** येथील नेर येथे दिवंगत शिक्षक नेते प्रा. पांडुरंग आठवले यांच्या पाचव्या स्मृतिदिनी त्यांच्या विचार-कार्यास उजाळा देऊन त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी शरद मोरे यांनी सांगितले की, प्रा. पांडुरंग आठवले हे चालती-बोलती चळवळ होते, त्यांच्या प्रत्येक परिचित व्यक्तीशी त्यांचे जिव्हाळ्याचे नातेसंबंध होते,जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन प्रा. आठवले यांनी सामाजिक कार्य केले. सतत सामाजिक कार्याला आपलं आयुष्य अर्पण करीत सर्वांसाठी सहज उपलब्ध होणारे प्रा. आठवले यांना कधीच आपल्या पद व प्रतिष्ठा यांचा गर्व केला नाही तर आपण समाजाचं देणं लागतो हा विचार जपत प्रा. आठवले यांनी लोकांशी नाळ जोडून सामाजिक-धार्मिक व शैक्षणिक कार्य करीत कार्यकर्ते निर्माण केले. प्रा. मिलन तायडे यांनी प्रा. आठवले यांच्या कार्याचा आढावा घेतांना सांगितले की, अध्यापन हे विद्यार्थीकेंद्री असावं, आपली भाषा, आपला विषय हे आपण विद्यार्थ्यांना सांगत व शिकवत असतांना व्यापक व सर्वसमावेशक ज्ञान देणं गरजेचं आहे, विद्यार्थ्यांना नेहमीच नव्या ज्ञानाची भर घातली पाहिजे.अध्यापन पद्धतीने अचूक नि योग्य मार्गदर्शक म्हणून प्रा. पांडुरंग आठवले यांच कार्य आहे, डॉ. मिलिंद आठवले यांनी प्रा. पांडुरंग आठवले यांच्या कार्यवर प्रकाश टाकला, यावेळी इतर उपस्थित मान्यवरांनीसुद्धा आपले मनोगत व्यक्त केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनिल गवई यांनी केले, सूत्रसंचालन मिलिंद जामकर यांनी केले तर आभार उमेश इंगोले यांनी मानले,



यांप्रसंगी वासुदेवराव शेंडे, प्रा.निलेश मोखाडे, अविनाश शेंडे , सतीश तायडे , अनिरुद्ध मुंदाने, त्रिशरण गायकवाड, अरविंद पाटील, प्रज्ञाताई मोखाडे व वनिता मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.




# नवसाला पावणाऱ्या रोकडोबा महाराज मंदिराचा पर्यटन स्थळात समावेशासाठी प्रयत्न करणार-आ. नारायण कुचे

## उज्जैनपुरी येथे नवसाला पावणाऱ्या रोकडोबा महाराज यात्रा उत्सव उत्साहात संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** नवसाला पावणाऱ्या उज्जैनपुरी (ता. बदनापूर) येथील रोकडोबा महाराजांची कीर्ती आता देशभर पोहोचली असून, केवळ जिल्ह्यातूनच नव्हे तर संपूर्ण भारतातून भाविक येथे दर्शनासाठी येतात. या मंदिराचा विकास करण्यासाठी आणि त्याचा पर्यटन स्थळात समावेश करण्यासाठी लवकरच जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांची भेट घेऊन तसा प्रस्ताव सादर करण्यात येईल, अशी ग्वाही बदनापूर मतदारसंघाचे आमदार नारायण कुचे यांनी दिली.

### रोकडोबा महाराजांच्या दर्शनानंतर मन प्रसन्न झाले-महापौर वंदना मगरे

रोकडोबा महाराजांच्या मंदिराविषयी अनेक दिवसांपासून ऐकून होते, आज प्रत्यक्ष दर्शन घेतल्यावर मन खरोखरच प्रसन्न झाले आहे. या मंदिराला पर्यटन स्थळाचा दर्जा मिळवून देण्यासाठी माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार नारायण कुचे आणि माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्याकडे मी स्वतः पाठपुरावा करणार आहे. लवकरच हे मंदिर पर्यटन नकाशावर दिसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

रोकडोबा महाराज वार्षिक यात्रा उत्सव शनिवार दि. २१ मार्च रोजी साजरा करण्यात आला. यानिमित्त सात दिवस सप्ताह आयोजित करण्यात आला होता. त्यात विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. यात्रेनिमित्त सकाळी ७ वाजता रोकडोबा महाराज मंदिर ते महादेव मंदिर अशी भव्य दिंडी काढण्यात आली.

दिंडी मार्गावर भाविकांनी आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या. उज्जैनपुरी ग्रामपंचायत ते मंदिरापर्यंत महाराजांची वस्त्र दिंडी हे आकर्षणाचे केंद्र ठरले. याप्रसंगी आ. नारायण कुचे, जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, अखिल भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष





सुरेश मुळे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे म्हणाले की, शिवसेना आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या माध्यमातून पालकमंत्री पंकजा मुंडे यांची भेट घेऊन हे मंदिर पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.

यावेळी मंदिरात कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. कीर्तनापूर्वी ब्राह्मणवृंदाचा सत्कार करण्यात आला. गावातील प्रथेनुसार ब्राह्मणांचा नैवेद्य आणि महाप्रसाद घरोघरी करण्यात आला, तर गावकऱ्यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन कंडारी रोडवरील शेतात करण्यात आले होते.

या सोहळ्याला किशोर मुळे, विलास मुळे, कैलास मुळे, सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे, सरपंच संतोष चोरमारे, संजय घुगे, जनार्दन चोरमारे, परमेश्वर शिंदे, रामेश्वर शिंदे, बाजीराव पाटील शिंदे, भिकाजी जाधव, पांडुरंग शिंदे, संजय वाघ, दिलीप मुळे, रामनाथ शिंदे, हरिभाऊ वाघ, राजू घुगे, कैलास शिंदे, दादाराव शिंदे, बाबासाहेब शिंदे, भगवान पवार, विष्णू शिंदे, नरेंद्र मुळे, विठ्ठल शिंदे, गणेश चोरमारे, ज्ञानेश्वर शिंदे, सोमीनाथ शिंदे, प्रदीप मुळे, दिगंबर मुळे, अशोक देवा पाटणकर, कैलास आप्पा, काका शिंदे, हरिश्चंद्र घुगे, पंढरीनाथ शिंदे, डॉ. सुभाष भाले, शार्दुल भाले यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या युवक परतूर तालुका अध्यक्षपदी सिद्धेश्वर अंभूरे यांची निवड

**परतूर । प्रतिनिधी -** राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीच्या युवक तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.तरी आपण पक्षाच्या वाढीसाठी व पक्षाची ध्येय धोरणे सर्व सर्वसामान्या पर्यंत पोहोचविण्या साठी पक्षाला आपले सहकार्य राहील असा मला विश्वास आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण, माजी आ.सुरेशकुमार जेथलीया, महाराष्ट्र युवक सरचिटणीस मा. नितीन जेथलीया,व युवक जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सरकटे यांच्या नेतृत्वाखाली आपल्या भागामध्ये पक्ष संघटन वाढविण्यासाठी कटिबद्ध व्हावे. परतूर तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष पदी सिद्धेश्वर अंभूरे यांची निवड माजी आ.सुरेशकुमार जेथलीया यांच्या प्रमुख उपस्थितीत व युवक जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली सरकटे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी



युवक प्रदेश सरचिटणीस नितीन जेथलीया.तालुकाध्यक्ष बाबासाहेब गाडगे. इंद्रजित घनवट. सोनू धुमाळ. गणेश ढवळे. बाळू अंभूरे. अक्षय अंभूरे. उदय नेब. योगेश अंभूरे. सौरभ अंभूरे. अमन अंभूरे.निखिल अंभूरे इत्यादी उपस्थित होते.

# आर.टी.एस. परीक्षेला महाराष्ट्र व गोवा राज्यात प्रंचड प्रतिसाद

## जालना जिल्ह्यातील ३१६७ विद्यार्थ्यांनी दिली परिक्षा



**जालना । प्रतिनिधी -** इयत्ता २ ते ९ वी पर्यंत सर्व वर्गातील विद्यार्थांसाठी दरवर्षी डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद व फाउंडेशन द्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या () ला महाराष्ट्र व गोवा राज्यात प्रंचड प्रतिसाद मिळाला राज्यातील १२० परीक्षा केंद्रावर परीक्षा पार पडली असून जालना जिल्ह्यातील ३१६७ विद्यार्थांनी मोठ्या उत्साहात आज परिक्षा दिली. सदरील परीक्षा पार पाडण्यासाठी राज्यभरात ६१७ पर्यवेक्षक व २४ भरारी पथकाची स्थापना करण्यात आली होती. मुलांना स्पर्धा परीक्षांची लहान वयातच गोडी लागावी व भविष्यात येऊ घातलेल्या आव्हानांना पेलन्याची क्षमता विद्यार्थांमध्ये निर्माण व्हावी यासाठी इयत्ता २ री ते ९ वी पर्यंत प्रत्येक वर्गातील विद्यार्थांसाठी जालना जिल्ह्यातून सुरु करण्यात आलेल्या सदरील शिष्यवृत्ती परीक्षेला दिवसेंदिवस मोठा प्रतिसाद मिळत असून सदरील परीक्षेत यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्य व जिल्हा स्तरावर शिष्यवृत्ती, सन्मानपत्र व स्मृती चिन्ह देऊन सन्मानित करण्यात येते. सन २०१४ पासून सुरु झालेल्या सदरील परीक्षेला या वर्षी १४ वर्षे पूर्ण झाली आहेत व उपक्रम यशस्वीपणे सुरु आहे.

जालना जिल्ह्यातील ३१६७ विद्यार्थांनी यावर्षी परीक्षेत सहभाग नोंदविला होता. जिल्ह्यातील १) सेंट मेरीज हायस्कूल, जालना २) विश्वनाथ विद्यालय, तळणी ता.- मंठा ३) गणपती एज्युकेशनल सोसायटी, राजूर ता. भोकरदन जि. जालना ४) जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, भोकरदन ५) स्वामी विवेकानंद विद्यालय, बूटखेडा जालना ६) जि.प. प्रशाला, बूटखेडा - जाफ्राबाद अशा एकूण सहा परीक्षा केंद्रावर अतिशय नियोजनबद्ध व शिस्तीत आज हि परीक्षा पार पडली परीक्षेचे स्वरूप, नियोजन व उपक्रमाबद्दल शिक्षक, पालक व विद्यार्थांनी समाधान व्यक्त केले. सदरील परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी पप्पू पाटील भोयर, लक्ष्मण नेव्हल, दिपाली खलसे, भास्कर शिंदे, सतीश काळे, कृष्णा वाघ, विठ्ठल घायाळ, अनंत मिटकरी, दिपक चव्हाण, चक्रधर जाधव, रमालक्ष्मी रेड्डी, गजानन देशमुख, वंदना दुबे, फ्रान्सिस सर, संगीता गनोजे, सुनील ठाकरे, विजय नारखेडे, बाळू बुधवंत, सुखदेव बावणे, रामेश्वर जाधव, निलेश पाटील, नितीन कपटी, बंडू गाडेकर, कृष्णा बनकर, दिगंबर जगताप, सुनिता जगताप, राजेश वैद्य, मनीष साबळे, विनोद मडवी, नामदेव दळवी, उमाकांत राउत, रीना मात्रे, सुर्यकांत कन्हाळे, राजेंद्र जाधव आदींनी प्रयत्न केले आहे.



**चार दिवसीय गणगौर उत्सवाला सुरुवात कादराबाद येथून मिरवणूक काढण्यात आली यावेळी हरीप्रसाद देविदान, दिलीप अग्रवाल, गणेश अग्रवाल, नंदू भारूका,दीपक भरतिया, अल्केश अग्रवाल, रितेश अग्रवाल, श्याम मल्लावत, राजू वैष्णवी, योगेश टाक, संजय भुतिया, कैलास भरतिया, हिमेश भरतिया, पद्मा अग्रवाल, उमा अग्रवाल, चंदा अग्रवाल, उषाबाई भरतिया नीतू भारुका, पुनम अग्रवाल, खुशबू अग्रवाल, दीपा अग्रवाल, आरती भारुका, नीतू भारुका, सोनल भरतिया, माधुरी भरतीया आचल भारुका, दिपाली अग्रवाल आदी. (छाया - जावेद तांबोली)**

## माजी मंत्री दत्ता मेघे यांचे निधन

**नागपूर -** माजी मंत्री आणि ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांचे निधन झालं आहे. वयाच्या ८९ वर्षी हृदयविकाराच्या धक्क्यानं त्यांचे निधन झाले आहे. दत्ता मेघे हे काँग्रेसचे सरकार असताना नागपूरचे पालकमंत्री होते. त्यासोबतच रामटेक, वर्धा लोकसभा मतदार संघातून ते खासदार म्हणून देखील निवडून गेले होते. त्यांचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात भरीव काम होते. ते हिंगणा विधानसभा मतदार संघातील भाजप आमदार समीर मेघे यांचे वडील आहेत. दत्ता मेघे यांच्या निधनाने विदर्भासह राज्याच्या राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मेघे यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९३६ रोजी वर्धा जिल्ह्यातील पवनार येथे झाला होता. त्यांनी आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत चार वेळा लोकसभा खासदार म्हणून नागपूर, रामटेक व वर्धा मतदारसंघांचे प्रतिनिधित्व केले.

### सावंगी तलाव मंडळातील निरखेडा येथे समाधान शिबिर उत्साहात

# अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांची भेट

## सातबारा, ८- अ उतारे व फेरफार प्रकरणावर तत्काळ कार्यवाही

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील सावंगी तलाव मंडळांतर्गत येणाऱ्या निरखेडा येथील श्री रामेश्वर मंदिर परिसरात रविवार दि.२२ मार्च २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी प्रत्यक्ष भेट देऊन शिबीराचा आढावा घेऊन लाभार्थ्यांना लाभाचे प्रमाणपत्र वितरित केले.

शासनाचे विविध विभाग आणि त्यांच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती तसेच लाभ एकाच छताखाली मिळावा, या उद्देशाने हे शिबिर भरवण्यात आले होते. श्री. मिसाळ यांनी



यावेळी विविध विभागाच्या स्टॉल्सची पाहणी केली आणि नागरिकांशी संवाद साधला. महसूल, आरोग्य आणि कृषी विभागाशी संबंधित प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

प्रशासकीय यंत्रणा जनतेच्या दारी नेऊन त्यांच्या समस्यांचे जागेवरच निराकरण करणे, हे या शिबिराचे मुख्य उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी मिसाळ यांनी यावेळी केले.

शिबिरात सातबारा, ८- अ उतारे व फेरफार प्रकरणावर तत्काळ कार्यवाही करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात संजय गांधी निराधार योजना, रेशन कार्ड दुरुस्ती आणि विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, तहसीलदार छाया पवार, मंडळ अधिकारी प्रविण डोईकर आणि निरखेडा परिसरातील तसेच सावंगी तलाव मंडळातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**जालना शहरांमध्ये एलपीजी गॅसच्या रिक्षा असलेल्या गॅस पंपवर काही ठिकाणी एलपीजी संपला असून दत्त मंदिर समोर उपलब्ध आहे. त्या ठिकाणी रिक्षांच्या रांगा लागून गॅस भरतांना दिसत आहे. व एलपीजी गॅसच्या किमतीतही मोठी वाढ झालेली दिसून येत आहे. ८४ रुपयांपासून ते ९५ रुपयांपर्यंतचे दर सध्याचे आहे. (छायाचित्र - किरण खानापुरे)**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.